**<u>सन 2017-18 करिता दि.30 सप्टेंबर 2018 पर्यंत मुदतीसाठी</u>**

**<u>पहिला फेर लिलाव</u>**

वाळू निर्गती सुधारित धोरण शासन (महसूल व वन विभाग )निर्णय क्र.गौखनि-10/0512/प्रक्र.300/ख, दिनांक 12/03/2013.

( ई-निविदा सह ई-लिलाव)

**अटी आणि शर्ती**

अहमदनगर जिल्हयातील रेती/वाळू घाटाकरिता पर्यावरण विभागाच्या अटीशर्तीस अधीन राहुन ई टेंडर सह कम ई-ऑक्शन (ई-निविदासह ई-लिलाव) पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

**1.)** ई-निविदासह ई-लिलावसाठी अहमदनगर जिल्हयाकरीता आय.सी.आय.सी.आय. बँकेची (अहमदनगर शाखा) नियुक्ती करण्यात आलेली आहे.

**2.)** अहमदनगर जिल्हयातील रेती/वाळूघाट सन 2017-18 करिता दि.30/09/2018 पर्यंतच्या मुदतीसाठी ई-निवीदा सह ई-लिलावाद्वारे रेती/वाळुच्या निर्गती करणेसाठी सविस्तर माहिती http://www.**ahmednagar.nic.in** या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिध्द करण्यात आली आहे. रेती/वाळुघाटासंबंधी विस्तृत माहिती उपरोक्त नमुद वेबसाईटवर/ संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. इच्छुक निविदाधारकांना जिल्हयातील रेती/वाळुघाटांचा ई-निवीदासह ई-लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घेणेसाठी विनंती करण्यात येत आहे. ई-निविदा व ई-लिलावासाठी इच्छुक निविदाधारकांनी ई-लिलाव कम ई-ऑक्शन विषयक तांत्रिक व सविस्तर माहिती घेणेकामी आय.सी.आय.सी.आय संस्थेचा दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक **(+91-241) 245 1862, +91-97655 67728, Fax (+91-241) 245 1864, Email:sale@abcprocure.com** किंवा **support@abcprocure.com** वर संपर्क साधण्यात यावा.

**3.)** जिल्हयातील प्रत्येक रेती/वाळु स्थळांसाठी वेगवेगळी निविदा खरेदी करावी लागेल. ई-निविदा व ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेणाऱ्या निविदाधारकांनी ऑनलाईन नोंदणी (Registration) करणे अनिवार्य राहील. ऑनलाईन नोंदणीसाठी पुढील माहिती व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती इच्छूक निविदाधारकांनी सादर करणे बंधनकारक आहे. 1) ई-मेल आयडी, 2) पॅन कार्ड 3) टॅन नंबर (कंपनी असल्यास), 4) जीएसटी नंबर, 5) मागील तीन वर्षांचे आयकर विवरणपत्रे (सन 2014-15, 2015-16 2016-2017), 6) निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र 7) रहिवास प्रमाणपत्र, 8) आधार कार्ड तसेच अधिकृत संस्थेकडून प्राप्त डिजिटल सिग्नेचर (डिजिटल की)

**4.)** ई-निविदा सह ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेऊ इच्छिणाऱ्यास पुढील प्रमाणे ना-परतावा फी अदा कराव्या लागतील. 1) नोंदणी फी (फक्त एकदाच) - रु.2809/-, 2) फॉर्म फी (प्रत्येक वाळूस्थळाकरीता स्वतंत्र) - रु.2000/- (अपसेट प्राईस दहा लाखांपर्यंत असणा-या वाळू स्थळासाठी) रु.5000/- (अपसेट प्राईस दहा लाखापेक्षा जास्त असणा-या वाळू स्थळांसाठी), 3) प्रक्रिया फी (प्रत्येक वाळूस्थळाकरीता स्वतंत्र) - रु.1500/- सदरहू रकमा नेट बँकिंग/क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड (एनईएफटी/आरटीजीएस) पध्दतीने अदा कराव्या लागतील.

**5.)** ई-निविदेसह ई-लिलावात भाग घेणा-या व्यक्तीला अनामत रक्कम म्हणून किमान रु.3,00,000/- (रुपये तीन लक्ष फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या 20% यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अनामत रक्कम (EMD) म्हणून अपर जिल्हाधिकारी अहमदनगर / जिल्हाधिकारी यांचे ठरवून दिलेल्या खात्यावर जमा करावी लागेल. परंतु, ज्या रेती/वाळूगटाची हातची किंमत रु.10 लाखापेक्षा कमी असेल तर 3,00,000/- रुपये अनामत रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल. सदरची रक्कम लिलावधारकांने लिलावाच्या मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास लिलावाची मुदत संपल्यानंतर परत करण्यात येईल. अर्टी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

**6.)** इच्छुक व्यक्तींना ई-निविदा व ई-लिलाव दोन्हीमध्ये भाग घेणे अनिवार्य राहील. ज्या व्यक्तींनी ई-निविदा भरलेली असेल त्यांना पुन्हा त्याच वाळूस्थळाच्या ई-लिलावाकरिता EMD अथवा फॉर्म फी व प्रक्रिया फी भरण्याची आवश्यकता राहणार नाही.

**7.)** ई-निविदा व ई-लिलावाद्वारे प्राप्त झालेले देकार हातच्या किंमतीपेक्षा जास्त असणे अनिवार्य आहे.

**8.)** रेती/वाळू घाटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस (हातची किंमत) पेक्षा अधिक बोलीने लिलावाच्या बोलीनेच सुरुवात करण्यात यावी.

**9.)** ईच्छुक लिलावधारकाने प्रत्येक वाळूघाटांसाठी रु.10,000/- रक्कमेच्या पटीने प्रत्येक बोली बोलणे आवश्यक राहील.

**10.)** ई-लिलावासाठी ठरविण्यात आलेली वेळ संपण्याच्या अगोदर जर कोणी निविदाकाराने शेवटच्या 05 मिनिटांमध्ये बोली लावण्याचा प्रयत्न केल्यास लिलावाच्या कालावधीत 10 मिनिटांची अपोआप वाढ होईल. सदरची वाढ ही तीन वेळाच वाढविण्यात येईल.

**11.)** लिलावातील/ निविदेतील सर्वोच्च बोलीचा देकार स्विकारावयाचा किंवा नाकारावयाच्या बाबत निर्णय अपर जिल्हाधिकारी /जिल्हाधिकारी यांना राहील सदर निर्णय संबंधितास बंधनकारक राहील.

**12.)** एखाद्या विशिष्ट अगर सर्व वाळूघाटांची ई-निवीदासह लिलाव प्रक्रिया स्थगित अगर रद्द करण्याची तसेच प्रक्रियेतील कोणत्याही टप्प्याचा कालावधी वाढविणे याबाबतचे अधिकार अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी राखून ठेवलेला आहे.

**13.)** सर्वोच्च ई- निविदा/ ई-लिलाव स्वीकारल्यानंतर 24 तासाच्या आत 1/4 रक्कम भरल्यानंतर उर्वरीत रक्कम 15 दिवसांत ई-निविदा / ई-लिलावातील नमूद केलेली उर्वरित रक्कम एकरकमी भरणा करणे बंधनकारक आहे. अशा हमीचे दायीत्व स्वीकारणाऱ्या दोन व्यक्तीसह निविदाधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपये 100/- इतक्या रकमेच्या मुद्गांकीत (स्टॅम्प पेपर) कागदावर करारनामा करुन देईल. असे करारपत्र करुन न दिल्यास त्याने भरलेली 1/4 रक्कम जप्त करण्यात येईल व ई-निविदा / ई-लिलाव रद्द करुन संबंधीत वाळू घाटाच्या फेर ई-निविदा / ई-लिलाव करण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरील प्रमाणे करारपत्र न केल्याच्या परिणामी निविदाधारकास होणाऱ्या कोणत्याही

नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. करारपत्र केल्यानंतर व उक्त वाळुसाठा मंजुरी आदेश निर्गत केल्यानंतर त्या वाळूस्थळाचा प्रत्यक्षात ताबा उशीरात उशीरा सात दिवसात देण्यात येईल.

**14.)** रेती/वाळू (ठेका) ई-निविदा / ई-लिलाव ज्यावेळी रद्द करण्यात येईल अशा वेळेस त्या रेती/वाळू घाटाचा नव्याने जाहीरनामा काढून फेर ई-निविदा / ई-लिलाव करण्यात येईल. फेर ई-निविदेत / ई-लिलावात पुर्वीच्या ई-निविदा / ई-लिलाव किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पुर्वीच्या निविदाधारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि फेरनिविदेत पुर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पुर्वीच्या निविदाधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

**15.)** ई-निविदा / ई-लिलावाद्वारे घ्यावयाच्या रेती/वाळू घाटात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतुकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत, याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत निविदाधारकाची राहील. त्यानंतर याबददल कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

**16.)** निविदाधारक, त्यांच्या ई-निविदा / ई-लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती/वाळू काढल्याने धूप होऊ होईल व तसेच निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून रेती/वाळूचे स्वतः उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारे अपर जिल्हाधिकारी/ जिल्हाधिकाऱ्यांचे निर्णय अंतिम असतील. त्यानंतर याबद्दलच्या कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

**17.)** विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तीच्या खाजगी मालकीच्या जमिनीतून, अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी रेती/वाळू काढता येणार नाही तसेच रस्ते / पायवाट म्हणून वापरण्यात येणाऱ्या जमिनीतून रेती/वाळू काढता येणार नाही.

**18.)** कोणत्याही रेल्वेच्या पुलाच्या कोणत्याही बाजूने 600 मीटर्स (2000 फुट) अंतराच्या आत रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच जेथे नदी- नाल्यांवर पूल आहेत, त्याच्या स्तंभापासून 100 मीटर्स पर्यंत रेती/वाळु उत्खनन करता येणार नाही.

**19.)** रेती/वाळूचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व निविदाधारकावर राहील, अशा हानीची/ नुकसानीची परिगणना सक्षम अधिकाऱ्याकडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकीप्रमाणे संबंधीत निविदाधारकाकडून वसूल करण्यात येईल.

**20.)** लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा रेती/वाळू काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही. तसेच लिलावधारकास कोणत्याही वैध कारणामुळे ग्रामस्थांचा विरोध, न्यायालयीन निर्णय, नैसर्गिक अडीअडचणी, प्रशासकीय यंत्रणांचा विरोध यामुळे उत्खननास किंवा वाहतूकीस बाधा आल्यास किंवा वाळू गटाचा ताबा न दिल्यास, लिलावाची मुदत संपण्यापूर्वी ज्या

कालावधीसाठी ठेका रद्द केला जाईल, त्या कालावधीसाठी, त्याने ज्या किंमतीला लिलाव घेतला त्या रक्कमेच्या प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल, अशी रक्कम परत करतांना लिलावाची देकाराची रक्कम लिलावातील अंदाजीत रेती/वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेल्या वाळूसाठा विचारात घेऊन त्यानुसार परताव्याचा रक्कमेची परिगणना करण्यात येईल. परंतू लिलावाची मुदत संपण्यापुर्वी ज्या कालावधीसाठी ठेका रद्द केला जाईल, त्या कालावधीसाठी, त्याने ज्या किंमतीला लिलाव घेतला त्या रक्कमेच्या प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल, अशी रक्कम परत करतांना लिलावाची देकारची रक्कम लिलावातील अंदाजीत रेती/वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला रेती/वाळू साठा विचारात घेवून त्यानुसार परताव्याच्या रक्कमेची परिगणना करण्यात येईल.

**21.)** रेती/वाळु उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या रेती/वाळूची साठवणूक, ई निविदा / ई-लिलाव ज्या अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी यांनी केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी ई निविदा / लिलावधारकाची असेल. रेती/वाळू साठवण्यासाठी एकच सलग जागा ठरविता येईल. ते ठिकाण नदीपात्रापासून 200 मीटर पैक्षा अधिक अंतरावर नसावे. सदरच्या क्षेत्रात नदीपात्रातून जाण्यासाठी एकच आणि नदीक्षेत्रातून बाहेर रस्त्यावर पडण्यासाठी एकच मार्ग असेल आणि उर्वरीत सर्व क्षेत्र अशा प्रकारे बंद करावे लागेल की, ज्यामुळे तेथे एकही वाहन आंत किंवा बाहेर जाऊ शकणार नाही. यासाठी लाकडी/तारेचे/ लोखंडी/ भिंतीचे/दगडाचे कुंपन किंवा मोठी मोठी दगडे जे हालवता येणे अशक्य आहे ती ठेवणे किंवा खंदक अथवा चर खोदणे आवश्यक असेल वाळू ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळूचे उत्खनन केलेले आहे त्या रेती/वाळूचा साठा मुदत संपल्यानंतर 10 दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल व अशा रेती/वाळूच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत निविदाधारकास अथवा त्यांच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा दाखल करता येणार नाही.

**22.)** निविदाधारकाने / लिलावधारकाने जिल्हा परिषद कर/ पंचायत कर व इतर सर्व प्रकारचे कर विहित केल्याप्रमाणे शासनास अदा करावेत.

**23.)** निविदाधारकाने / लिलावधारकाने त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे खांब उभारावे. तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीने नेमलेल्या त्याच्या उपठेकेदाराचे नांव, पत्ता व जागेचा तपशिल दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक आहे.

**24.)** ई-निविदा / ई-लिलावाद्वारे दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्यानेच रेती/वाळूचे उत्खनन करण्याची जबाबदारी निविदाधारकाची / लिलावधारकांची राहील. रेती/वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, रेती/वाळू स्थळात पाणी आहे अशा तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व रेती/वाळूगट बदलून दिला जाणार नाही व लिलावांत भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

**25.)** रेती/वाळु उत्खनन केलेल्या रेती/वाळूच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच निविदाधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतुकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतुकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतुकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत रेती उत्खननाचा कालावधी वाढवून दिला जाणार नाही अथवा रेती/वाळूघाट बदलून दिला जाणार नाही व लिलावात भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

26.) प्रस्तावित वाळू भूखंड हा वन विभागाचे क्षेत्रालगत असलेस सदर लिलावधारक यांना वन विभागातील जमिनीमधून / क्षेत्रामधून वाळूची वाहतूक करता येणार नाही.

**27.)** नदीपात्रातून / नाल्यातून अथवा त्याला रेती/वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातुन रेती/वाळु उत्खनन करतांना नैसर्गिक संपतीस व पर्यावरणास धोका होणार नाही, याची सर्व खबरदारी निविदाधारकाने / लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

28) निविदाधारकाने / लिलावधारकाने गावकऱ्यांच्या निस्तार हक्कांस बाधा पोहोचविता कामा नये

**29.)** रेती/वाळू उत्खनन करताना अथवा हलविताना अपघात झाल्यास निविदाधारकाने / लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

**30.)** शौर्या इन्प्फोटेक, पुणे यांनी निर्माण केलेली मोबाईल आधारित सुलभ बारकोड पध्दत वापरणे अनिवार्य असून सदरची प्रणाली न वापरल्यास सदर रेती/वाळू वाहतूक अनाधिकृत समजून शासन राजपत्र, दि.12 जून, 2015 नुसार कारवाईस मी पात्र राहील, याची समज मला (लिलावधारकाला) देण्यात आली असून ती मला मान्य आहे.

**31.)** सदर प्रणालीनुसार लिलावधारकास त्याचे 3 मोबाईल नंबर रजिस्टर करणे बंधनकारक राहील. सदरचे 3 मोबाईल नंबर तीन स्वतंत्र मोबाईल कंपनीचे असावेत.

**32.)** लिलावधारकाने निर्धारित रेती/वाळूगटातून रेती/वाळूचे उत्खनन करुन प्रत्येक वाहनामधील रेती/वाळूचे परिमाण ,वाहन क्रमांक ,वाळूगटाचे नाव/क्रमांक ,वाहन कोठून कोठे जाणार आहे ,त्या दोन ठिकाणांमधील अंतर इत्यादी तपशिल नोंदणीकृत मोबाईलवरुन एसएमएसद्वारे (SMS) निर्दिष्ट क्रमांकावर कळविल. प्रणालीकडून लिलावधारकास नोंदणीकृत मोबाईलवर त्याने केलेल्या विनंतीनूसार त्यास एसएमएसद्वारे टोकन नंबर प्राप्त झाल्यानंतरच त्यास वाळूची वाहतूक करता येईल.

**33.)** रेती/वाळू वाहतूक करणा-या चालकाकडे उक्त टोकन नंबर नसेल किंवा टोकन नंबरचा कालावधी संपलेला असेल तर अशी वाहतूक अवैध ठरेल .

**34.)** रेती वाळूची वाहतूक करणा-या वाहनचालकाकडे वैध टोकन नंबर आहे किंवा नाही ,याबाबतचे निरीक्षण संबंधित महसूल यंत्रणेकडून तथा नियुक्त भरारी पथकाकडून केले जाईल, अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे वैध टोकन नंबर आढळला नाही किंवा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल

तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 मधील कलम 48(7), महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, 2013 ,आणि संदर्भाधिन दिनांक 12/03/2013 मधील व या कार्यालयाचा, दि.12/06/2015 नुसारच्या अध्यादेशानुसारच्या तरतूदीनूसार त्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

**35.)** रेती/वाळू लिलावधारकाने नोंदणीकृत मोबाईलवरुन एसएमएसद्वारे प्रणालीस कळविलेल्या परिमाणापेक्षा अधिक परिमाणाची वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौणखनिज अवैध आहे, असे समजून त्यावर नियमानूसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. दि.12/06/2015 नुसारच्या शासन राजपत्रानुसार गौणखनिजाच्या बाजार भावाच्या 5 पट दंडनीय कारवाई बरोबरच जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल, त्याचप्रमाणे लिलावधारकाने वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेती/वाळूबाबतची दैनंदिनी हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महसूल अधिकारी ,मंडळ अधिकारी, तलाठी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणारे अधिकारी यांनी मागणी केल्यास उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

**36.)** गौण खनिजाच्या उत्खननाचे, विक्रीचे व वाहतूकीच्या संबंधातील सर्व हिशोब व कागदपत्रे, लिलावधारकांने दिलेल्या जागेवर ठेवली पाहिजे. आणि सदरहू हिशोब व कागदपत्रे संबंधित महसूल अधिकारी, खनिकर्म अधिकारी तसेच भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांच्या निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत.

**37.)** निविदाधारकाने / लिलावधारकाने नियमात नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच महाराष्ट गौण खनिज उत्खनन नियम 2013 मधील तरतूदीनुसार असलेले नियम तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतूदीनुसार लागू असलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे निविदाधारकाने / लिलावधारकाने वाळूचा पूर्ण उपयोग गौणखनिज म्हणूनच केला पाहिजे.

**38.)** रेती/वाळूचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास निविदाधारकाने/ लिलावधारकाने विभागीय आयुक्त/ अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी यांच्याकडे 24 तासात कळविले पाहिजे.

**39.)** कोल्हापूर पध्दतीचे बंधारे असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/ विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक आहे.

**40.)** सार्वजनिक पाणवठा / पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून 100 मिटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडे उत्खनन करणे बंधनकारक आहे.

**41.)** अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळूसाठा रेती/वाळूगटात असल्यास त्यावर निविदाधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमाणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास निविदाधारकास मुभा राहणार नाही.

**42.)** मा.न्यायालयाने कोणत्याही वाळूपट्टयाबाबत/ लिलावाबाबत काही आदेश/ निर्णय दिल्यास सदर आदेश/ निर्णय निविदाधारकांवर बंधनकारक राहील तसेच रिट याचिका क्र. 4830/2010 मध्ये दिनांक 26/10/2010 रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्णयातील सर्व मार्गदर्शक सुचना निविदाधारकांवर बंधनकारक राहील.

**43.)** आयकर / विक्रीकर अधिनियमातील तरतुदीनुसार लिलावाच्या उच्चतम रकमांचे अनुषंगाने विक्रीकर (जीएसटी प्रमाणे), आयकर (TCS) 2 टक्के देणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. तसेच लिलाव घेणाऱ्या व्यक्तीस मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक राहील.

**44.)** लिलाव घेणाऱ्या व्यक्तीस रुपये 5000/- (रुपये पाच हजार) इतक्या रकमेचा उपसंचालक, महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, नाशिक यांच्या नावे काढण्यात आलेला धनाकर्ष (Demand draft) सर्वेक्षण शुल्कापोटी लिलावाच्या मंजुरी आदेशाच्या दिवशी जमा करावा लागेल.

**45.)** वाळूचे उत्खनन मनुष्यबळ व टोपली, घमेली व फावडयाद्वारेच करावे लागेल. कोणत्याही परिस्थितीत यांत्रिक साधनांचा वापर करता येणार नाही. वाळु उत्खननासाठी सक्शन पंपाचा वापर अनुज्ञेय नाही. तथापी, सार्वजनिक हितार्थ अपवादात्मक परिस्थितीत सक्शन पंपाचा वापर करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे अभिप्राय घेवुन त्यास शासनाची मान्यता घ्यावी लागेल.

**46.)** शासनाचे पुर्व परवानगी शिवाय निविदाधारकास / लिलावधारकास लिलाव ठेका दुसऱ्या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुसऱ्या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा लिलावानंतर भागीदारही घेता येणार नाही.

**47.)** रेती/वाळूचे उत्खनन केवळ सकाळी 6.00 ते सायंकाळी 6.00 या कालावधीतच करता येईल. या कालावधीनंतर केलेले उत्खनन अवैध समजून कारवाई करण्यात येईल.

**48)** निविदाधारकाने / लिलावधारकाने त्यास नेमुन दिलेल्या जागेतून उत्खनन केलेल्या वाळूचे परिमाण व रेती/वाळु खरेदी करणाऱ्याचे नांव व पत्ता, वाहतुक पास क्रमांक, दिनांक दर्शविणारे मासिक विवरणपत्र प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय (गौणखनिज शाखा) येथे सादर करणे आवश्यक आहे.

**49.)** लिलावधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रु.3,00,000/- (रुपये तीन लाख फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या 20 % यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांच्याकडे ठेवणे आवश्यक आहे. परंतु, ज्या रेती/वाळू गटाची हातची किंमत रु.10 लाखापेक्षा कमी असेल तर हातच्या किंमतीच्या 20 % अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल, ही रक्कम लिलावधारकाने लिलावाचे मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास लिलावाची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम अंशतः अथवा पुर्णतः जप्त करण्यात येईल.

**50.)** अवैध रेती/वाळूसाठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील 48(7) व (8) नुसार कारवाई करण्यात येईल.

**51.)** रेती/वाळू उत्खनन करताना अटी व शर्तीचे उल्लंघन करुन रेती/वाळूचे उत्खनन झाल्यास नियमबाहय वाळू उत्खननाने नदीकाठच्या गावातील पाण्याच्या व शेतीच्या पाण्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच रेती/वाळूच्या वाहतुकीमुळे नदीकाठच्या शेतीच्या रस्त्यांची हानी होण्याची शक्यता आहे, अशा परिस्थितीत विविध व्यक्ती व संस्थाकडून तक्रारी करण्यात येतात. अशा तक्रारीचे निवारण करण्यासाठी तसेच चौकशी करण्यासाठी जिल्हयातील अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीमध्ये खालीलप्रमाणे अधिकारी आहेतः-

| | |
|---|---|
| (1) जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| (2) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | - सदस्य |
| (3) सार्वजनिक बांधकाम विभागाचे जिल्हयातील कार्यकारी अभियंता | - सदस्य |
| (4) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांचे जिल्हयातील किंवा यथास्थिती विभागातील वरीष्ठ अधिकारी | - सदस्य |
| (5) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचा अधिकारी | - सदस्य |
| (6) जिल्हा खनिकर्म अधिकारी | - सदस्य सचिव |

लेखी स्वरुपात तक्रार प्राप्त झाल्यानंतर वरील समिती चौकशी करुन त्यांचे अहवाल जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करेल. त्यानंतर रेती/वाळूसाठयातून रेती/वाळू उत्खनन बंद करणे किंवा चालु ठेवणे याबाबतचा निर्णय अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी घेतील. अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी यांचा निर्णय मान्य नसेल अशा तक्रारदाराला मा.विभागीय आयुक्ताकडे अपील करता येईल.

**52.)** नद्यांच्या पात्रातील काही रेती/वाळुस्थळांचा लिलाव करण्यास व्यापक विरोध झाल्यास अशा रेती/वाळू स्थळांच्या लिलावासंदर्भात अंतिम निर्णय घेण्यासाठी मंत्री मंडळाची उपसमितीकडे पाठविण्यात येईल.

**53.)** दर महिन्याचे दुसऱ्या व चौथा रविवार रोजी मंजुर केलेल्या रेती/वाळू घाटातून रेती/वाळू उपसा करण्याचे काम बंद ठेवावे लागेल.

**54.)** शासन निर्णय दि.12/03/2013 नुसार जाहीर करण्यात आलेल्या काळया यादीतील व्यक्तींना निविदा भरण्यास प्रतिबंध करण्यात येईल.

**55.)** दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे जनहितास्तव कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांना असतील.

**56.)** या व्यतिरिक्त शासनाकडून याबाबत देण्यात येणार आदेश सुचना निर्णय तसेच आयुक्त/ जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचेकडून देण्यात येणारे आदेश सुचना/ निर्णय निविदाधारकांवर / लिलावधारकांवर बंधनकारक राहतील.

**57.)** रेती/वाळू उत्खनन व वाहतुक करताना संबधीत ठेक्यावरील तसेच वाहतुक करणाऱ्या कोणत्याही इसमांकडून शासन निर्णय क्र.गौखनि-10/0512/प्रक्र.300/ख दिनांक 12/03/2013 मधील व बारकोडच्या संदर्भातील तरतूदींचे तसेच सर्व प्रचलित कायदे, नियम, शासन निर्णय याचे अनुपालन करणे बंधनकारक राहिल.

## (ब) विशेष निर्देश व अटी व शर्ती

**1.)** वाहतुकीसाठी आवश्यक असणा-या सर्व पावत्या ठेकेदाराने स्वत: छापने बंधनकारक राहील आणि त्याचा सर्व खर्च ठेकेदाराला करावा लागेल. वाहतूक पावतीमध्ये खालील मजकुर नमुद असणे बंधनकारक आहे.

1) वाहतुक पास / अनुक्रमांक
2) तालुक्याचे व जिल्हयाचे नाव.
3) रेती घाटांचे नाव ,क्रमांक व एकुण साठा ( ब्रास)
4) रेती घाट लिलावधारकांचे नाव
5) रेती घाटांचे स्थान/ भांडार/ गाव शहर व ख.क्र.व आराजी.
6) लिलाव मंजुरी आदेशाचा क्रमांक व दिनांक
7) लिलावाचा कालावधी.
8) ट्रक / वाहन क्रमांक
9) वाहन चालकाचे नाव, मोबाईल क्रमांक
10) वाहनातील रेतीचे परिमाण.
11) वाळु जेथे नेण्यात येणार आहे ते संभाव्य ठिकाण.
12) रेती घाटातुन, रेती वाहनाव्दारे निर्गमित केल्याचा दिनांक व वेळ
13) टोकन नंबर.

**2.)** रेती/वाळू भरलेली गाडी साठयावरुन सोडतांना प्रथम त्याला देण्यात आलेल्या पावतीवर **बारकोड** प्रणालीद्वारे मोबाईल स्क्रिनवर आलेला टोकन क्रमांक नमुद करावा. अन्यथा पावती अवैध समजण्यात येईल. ज्यांना रेती/वाळू विकली ते कोणत्या गांवाला रेती/वाळू घेऊन जाणार त्यांचे संभाव्य स्थानही पावती देतांना नमूद करणे आवश्यक आहे.

**3.)** लिलावधारकांने त्याच्या लिलाव स्थळातील रेती / वाळुची वाहतुक करणा-या वाहनांस तो वाहुन नेईल इतक्या परिमाणाची व सलग क्रमांकांची वाहतुक पावती द्यावी. सदर पावती SMS करुनच देण्यात यावी. एखादे वाहन तपासणीमध्ये पावतीसह आढळुन आले, परंतु सदर पावतीवर टोकन क्रमांक नसल्याचे आढळुन आल्यास अशा प्रकारचे गौणखनिज अवैध व शासकीय मालमत्तेची चोरी समजण्यात येईल व याबाबत लिलावधारकांवर दंडात्मक/फौजदारी कारवाई करण्यात येईल. कोणतेही वाहन वहन क्षमतेपेक्षा अधिक परिमाणाची रेती / वाळु वाहुन नेत असल्याचे आढळुन आल्यास त्या वाहनातील संपुर्ण

गौणखनिज अवैध आहे, असे समजुन त्यावर प्रचलित नियमानुसार दंडात्मक कारवाई बरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल. तसेच सदर वाहनांवर मोटार कायद्यानुसार व अन्य प्रचलित कायद्यानुसार खालीलप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**अ)** सदर वाहनाचा वाहतुक परवाना पहिल्या गुन्हासाठी **30** दिवस, दुस-या गुन्हासाठी **60** दिवस व तिस-या गुन्हासाठी **90** दिवस याप्रकारे निलबिंत करण्यात येईल.

**ब)** वाहन परवान्याबरोबर वाहन चालकाच्या लायन्सन्सवर मोटार कायद्यानुसार परिवहन विभागास प्राप्त अधिकारात सदर चालकाचे लायसन्स पहिल्या गुन्हयाकरीता सहा महिन्या करीता निलंबित केले जाईल, अशाच प्रकारचा दुसरा गुन्हा करतांना एखादा वाहन चालक आढळल्यास त्यांचे ड्रायव्हिंग लायसन्स कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल.

**4.)** पावतीमध्ये नोंदी घेतांना कार्बन पेपरचा वापर करणे अनिर्वाय आहे. म्हणजेच पावतीची पहिली प्रत बॉलपेनने लिहावी व त्याखालील दोन्ही प्रती या पहिल्या प्रतीच्या व दुस-या प्रतीच्या खाली कार्बन टाकुन नोंद घेण्यात याव्यात. तसेच पहिल्या प्रतीच्या मागच्या बाजुवर देखील कार्बन उमटेल, अशा प्रकारे कार्बन वापरावा म्हणजेच पहिल्या पावतीच्या मागे आणि दुस-या व तिस-या पावतीच्या समोरील बाजुवर केवळ कार्बनच्याच नोंदी राहतील. पेनच्या नोंदी असणार नाहीत, अशा प्रकारचा कार्बन वापरुन पावती पुस्तकामध्ये नोंद आढळुन न आल्यास देण्यात आलेल्या पावतीवर नमुद प्रती ब्रास **रु.5000/-** इतका दंड संबंधित वाळुठेकेदार यांचेकडुन **( वाहनचालकाकडुन नव्हे )** वसुल केला जाईल.

**5.)** प्रत्येक वेळी ठेक्यावर **24 x 7** तास चालणारे **CC TV Camera** आणि **Halogen Lights** बसविणे आवश्यक राहील. किमान 05 सी.सी.टि.व्ही.कॅमेरा व **Halogen Lights** लावणे आवश्यक आहे. सदर **CC TV Camera हे हायडेन्सीटीचे असावेत रात्रीचे वेळी सदरचे चित्रीकरण होणेसाठी प्रखर प्रकाश देणारेच Halogen Lights** असणे आवश्यक आहे. ते अशा पद्धतीने बसवावे की त्यात पुढील सर्व जागा कव्हर होतील.

**i)** ज्या ठिकाणी पावती फाडण्यांचे काम होते ती जागा

**ii)** वाळू ठेक्यांचा स्पॉट वरुन रेती/वाळू आणि रेती/वाळू साठवण्याचे स्पॉट वरुन ज्या ठिकाणाहून गाडया बाहेर निघू शकतात व आत जाऊ शकता अशा मार्गावर (entry & exit points )ज्या ठिकाणी रेती/वाळु उत्खनन होते, अशा जागी अशाप्रकारे CC TV Camera लावणे आवश्यक आहे. त्या वाहनांचा गाडी क्रमांक त्यामध्ये नोदविला जाईल. सर्व ठेके सुरु झाल्यापासून संपेपर्यत संपूर्ण ठेक्यांचे बॅकअप कायमस्वरुपी जतन केले जाईल.

**iii)** रेती/वाळू ठेक्यांचा जास्तीत जास्त जागा **cover** होतील अशा उंच ठिकाणी **CC TV Camera** लावावे कि जेणेकरुन संपूर्ण जागा **cover** करता येईल.

**iv)** प्रत्येक ठेकेदारांने रेती/वाळू ठेकांच्या **CC TV Cam**era मधील फुटेज प्रत्येक आठवडयाला जिल्हाधिकारी कार्यालयास व तहसील कार्यालयांस सी.डी.मध्ये किंवा पेन ड्राईव्ह किंवा **external hard disk** मध्ये सादर करावीत.

**v)** **CC TV Camera** चे **resolution** इतके जास्त राहील कि माणसांचे चेहरे स्पष्ट पणे ओळखता आले पाहीजे. आणि त्या गाडयांचे नंबर स्पष्टपणे दिसले पाहीजे.

**vi)** सर्व सी.सी.टिव्ही कॅमे-याचे फुटेज सर्व अधिका-यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. तसेच हे थेट फुटेज सर्व नागरिंकाना पाहण्यासाठी उपलब्ध राहील.

**6.)** प्रत्येक रेती/वाळू साठयापासून बाहेर निघण्यासाठी नदी पात्राच्या दोन्ही बाजूला तहसीलदार मान्यता देतील तेवढेच **Exit point** (बाहेर निघण्याचे मार्ग असतील) एका स्पॉटवर नदीच्या एका बाजूला जास्तीत जास्त एक मार्गाची परवानगी देण्यात येईल. **(आत येणारा व बाहेर जाणारा मार्ग धरुन )** या शिवाय इतर मार्ग वाळू / रेतीस्थळाचे ठिकाणी असल्यास ते अशा पध्दतीने बंद करावे लागतील की, त्या ठिकाणाहून कोणत्याही वाहनांचे वाहतुक करणे शक्य होणार नाही. त्यासाठी आवश्यक ती उपाय सर्व योजना ठेकेदारानी स्वत: करावी.

**उदा.** मोठे बोर्ड लावणे, च-या खोदणे इत्यादी ठेकेदारानी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील. तथापी एखादया रेती/वाळू स्थळाच्या ठिकाणी या पेक्षा आधिक रस्ते आवश्यक असल्याचे निर्देशनांस आणून दिल्यांस त्यावर विचार करण्यात येईल. मात्र, अंतीम निर्णय जिल्हाधिकारी याचा राहील.

**7.) लिलावधारकांनी याशिवाय पुढील सुविधा पुरविणे आवश्यक आहे.**

**I)** प्रत्येक 10,000 ब्रास रेती/वाळु अथवा त्याच्या प्रमाणात अथवा त्याच्या भागासाठी एक सशस्त्र सुरक्षा रक्षक 12 तासासाठी पुर्ण ठेक्याच्या कालावधीसाठी जिल्हा प्रशासनाला पुरविणे आवश्यक आहे. याची नेमणुक जिल्हा प्रशासन त्यांना योग्य वाटेल त्या ठिकाणी करेल आणि रेती/वाळु ठेक्यापासुन दुर किंवा दुस-या तालुक्यात देखील त्याचा वापर करणे प्रशासनास कायदेशीर असेल.

**II)** जिल्हा प्रशासन सांगेल त्या ठिकाणी ( कोणत्याही तालुक्यात) सी.सी.टि.व्ही. कॅमेरा आणि स्टोअरेज फॅसिलिटीसह लावणे ठेकेदारांला बंधनकारक असेल. 50,000 ब्रास मागे किंवा त्याच्या भागासाठी अशा एक नाका प्रशासन सांगेल त्याठिकाणी लिलावधारकांला करुन द्यावा लागेल.त्याठिकाणी किमान 2 सी.सी.टिव्ही कॅमेरे असणे आवश्यक असेल आणि बॅकअप आधिका-यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक असेल.

**8.)** रेती/वाळु उत्खननाचा व पावती पुस्तकाचा हिशोब वेळच्यावेळी न देणे. आपल्या स्थळप्रतीमध्ये आणि वाहतुक करणा-या वाहन चालकाच्या प्रतिमध्ये तफावत असणे, इ.बाबीसुद्धा शर्तभंग समजण्यात येईल. अशा बाबी निर्दशनास आल्यास संबंधित ठेकेदारांचा ठेका रद्द करण्यात येईल.

**9.)** रेती/वाळु स्थळामधुन वाळु उत्खनन केल्यानंतर शिल्लक राहीलेली खडवान नदीपात्रामध्ये सपाट करण्याची जबाबदारी संबंधित लिलावधारकांची राहील.

**10.)** वाहतुक ठेकेदारांनी ठेक्याच्या स्पॉटवर विक्री केलेल्या रेती/वाळुबाबतचे नोंदीचे रजिष्टर ठेवणे आवश्यक असुन ठेकेदारांना देण्यात आलेल्या पावत्याचा हिशोब दर महिन्याच्या 5 तारखेच्या आत जिल्हाधिकारी कार्यालय व संबंधित तहसील कार्यालयास सादर करावा. ठेकेदारांकडे गौणखनिज रेती/वाळु उत्खननाबाबत नियमानुसार ठेवण्यात आलेल्या रजिष्टरमधील नोंदी व रेती/वाळु वाहतुकीसाठी वापरण्यात

येणा-या बारकोड पावत्यापैकी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रतिसह हिशोब सादर करावा. लिलावधारकांने विहित मुदतीत मासिक विवरणपत्र सादर केले नाहीतर त्याचे विरुध्द ठेका रद्द करणेबाबत तसेच त्याचे विरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकारी जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांना असतील.

**11.)** रेती/वाळु गटाच्या स्थळांचे एकत्रीकरण करणे किंवा विभाजन करण्याचे संपुर्ण अधिकार हा जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांना असेल.

**12.)** रेती/वाळु ठेका हा ई-लिलाव **(E-Auction)** आणि ई-निविदा **(E-Tender)** या दोन्ही पद्धतीने होणार आहेत. यापैकी ज्यामध्ये अधिक दर प्राप्त होतील त्यांना ठेका देण्यात येईल. सुरुवातीला दि.26/10 /2015 रोजी 5 वाजेपर्यंत ऑनलाईन ई-निविदा **(E-Tender)** स्विकारण्यात येतील. त्यानंतर सदर ई-निविदा **(E-Tender)** न उघडताच ई-लिलाव **(E-Auction)** सुरु करण्यात येईल. खुला लिलाव **(E-Auction)** संपल्यावर ऑनलाईन **(online)** आणि प्राप्त झालेल्या ई-निविदा व ई-लिलाव अशा दोन्ही प्रकारच्या निविदा **हया राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, मुंबई यांचेकडून पर्यावरण विषयक अनुमती प्राप्त झालेनंतरच उघडण्यात येतील.**

**13.)** रेती/वाळु स्थळाचा ताबा देण्यासाठी अटी, शर्ती मध्ये शिथिलता व कालावधीमध्ये फेरफार करण्याचे अधिकारी जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी असतील.

**14.)** याशिवाय जिल्हाधिकारी वेळोवेळी सांगतिल त्या अटी व नियम **(Features)** ज्यावेळी शासन कोणतेही संगणकीय प्रणाली वापरण्याचा आदेश निर्गमित करेल, त्यावेळी ती संगणकीय प्रणाली ठेकेदारांना वापरणे बंधनकारक राहील आणि त्यासाठी आवश्यक **Handware** आणि इतर सुविधा स्वखर्चाने ठेकेदाराला कराव्या लागतील.

**15)** लिलावधारकाला लिलाव घेतलेल्या क्षेत्राव्यतीरीक्त इतर आसपासचे क्षेत्रामध्ये वाळुसाठा करता येणार नाही. तसेच लिलावक्षेत्र वगळता आसपासच्या क्षेत्रामध्ये वाळुसाठा केल्याचे दिसुन आल्यास संबधित लिलावधारक यांनी त्याबाबत लेखी तक्रार संबधित तहसीलदार / उप विभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयास करणे बंधनकारक राहील अन्यथा उक्त वाळुसाठा अनधिकृत असल्याचे समजण्यात येउन MLRC च्या तरतुदीनुसार दंडात्मक व फौजदारी स्वरुपाची कारवाई करुन सदरचा लिलावाच्या अटीशर्तीचे उल्लंघन झाले म्हणुण संबधितांचा लिलाव रदद करन त्यापोटी शासनजमा असलेली अनामत रक्कम व बँक गॅरंटी (2 टक्के) जप्त करणेची कार्यवाही तात्काळ करणेत येईल.

**16)** कोणत्याही अटी व शर्तीचा एकदा देखील भंग झाल्यास जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांनी पुर्ण अनामत जप्त करुन ठेका रद्द करणे व शिवाय इतर कायदेशीर कारवाई करणे कायदेशीर राहील.

## पर्यावरण विषयक अटी व शर्ती

1. under no circumstances mechanical mining shall be adopted. Mining shall be done only by using manual methods.
2. Excavation shall be carried out such way that 2 m of sand is left on river bed after mining.
3. Under water mining using suction machinery will not be carried out without sanction from district authority
4. No mining shall be carried out within 200m distance from the riverine structures.
5. The instruction from the Central Government conveyed in the GR dated 26 Dec 2014 (regarding the sand mining approval and tracking system and transport of excavated sand)
6. There should not be the damage to the roads, pipelines and agriculture field due to the excavation activity.

**Specific and general Conditions applicable for Mining of Sand**
**"Annexure A"**

**Specific Condition:**

1. The proposals are recommended for environment clearance for the year of 2017-18 (up to 30/09/2018)
2. Provisions stipulated in Maharashtra Minor Minerals Extraction (Development And regulation) Rules 2013 and Government resolution of Revenue and Forest department dated 12/03/2013.
3. Tahasildar will be held responsible for non-compliance of the conditions stipulated in the Environmental Clearance and shall be liable for legal action under Environment (Protection) Act of 1986.
4. District Collector will take bank guarantee up to 2% of the total auction cost for the given auction period from project proponent to ensure the compliance of the conditions stipulated. In case of violation of stipulated conditions by project proponent, bank guarantee so obtained shall be forfeited and legal action under the law should be initiated against such project proponent.
5. The depth of the sand layer to be mined after retaining 2 m minimum layer below,should not be more than 2 m as per the Government Resolution of Revenue Department dated 12th March 2013. Ie. If the depth is 3 m then 1 m sand shall be mined.
6. It shall be ensure that excavation of minor mineral does not disturb or change underlaying soil characteristics of the river bed/basin where mining is carried out.
7. It shall be ensure that mining does not in any way disturb the turbidity, velocity and flow pattern of the river water.
8. A siltation study should be carried out before commencement of the mining activity or within a period of one year through some expert Agency like NIO/CWPRS to determine the siltation load so that there is no over exploitation of the material at any point of time. The mineral to be removed shall be determined based of siltation load. This study shall be steered by competent authority while granting further mining lease or renewing of the licence. A copy of siltation study shall be submitted to the

Environment Department, District mining officer and respective regional of state pollution control board.

9. It shall be ensure that there is no fauna dependant on the river bed or area close to mining for its nesting.

10. Turtle nesting units conservation is very important. Therefore sand mining in such area is to be prohibited.

11. The green belt development/ tree plantation will be made in an area of 20% of the total lease area either on river bank or along road side.

12. Measure for prevention and control of soil erosion and management of silt shall be undertaken. Protection of dumps against erosion, if any, shall be carried out with geo textile matting or other suitable material.

13. Tahasildar to ensure that there is no violation of the Supreme Court order and orders of National Green Tribunal given in the related matter.

**General Conditions:**

1. Precise mining area will be jointly demarcated at site by Mining/Revenue department prior to mining operations for all proposals under consideration. Such site plan duly verified by competent authority shall be submitted to District Mining officer.

2. All necessary statutory clearances shall be obtained before start of mining operations.

3. Depth of mining shall be restricted to 3m or water level whichever is less.

4. No mining shall be carried out in the streams.

5. Mining shall be limited to day hours time only. The loading shall not be done during night hours.

6. No mining shall be carried out in the safety zone of any bridge and/or embankment.

7. No mining shall be carried out in the vicinity of natural/manmade archaeological site.

8. The lease holder shall obtain necessary prior permission of the competent authorities for drawal of requisite quantity of water (Surface Water and Ground water), if required for the project.

9. Waste water if any shall be properly collected and treated so as to conform to the standards prescribed by MoEF/ CPCB.

10. No wildlife habitat will be infringed.

11. Environment clearance is subject to obtaining clearance under the Wildlife (Protection) Act 1972 from the competent authority, if applicable to the project.

12. Green belt development shall be carried out considering CPCB guidelines including selection of plant species and in consultation with the local DFO/ Horticulture Officer.

13. Parking of Vehicles should not be made on Public Places.

14. Transportation of material shall be done by covering the trucks/ tractor with tarpaulin of other suitable mechanism so that no spillage of mineral/ dust take place.

15. Appropriate mitigative measures shall be taken to prevent any kind of pollution in consultation with the Maharashtra Pollution Control Board. It shall be ensured that there is no leakage of oil and grease, from the vehicles used for transportation.

16. Vehicular emissions shall be kept under control and regularly monitored. The mineral transportation shall be carried out through the covered trucks only and the vehicles carrying the mineral shall not be overloaded.

17. Special Measures shall be adopted to prevent the nearby settlements from the impact of mining activities. Maintenance of road through which transportation of minor minerals is to be undertaken, shall be carried-out regularly.

18. Dispensary facilities for First-Aid shall be provided at site.

19. Occupational health surveillance program of the workers should be undertaken periodically.

20. Provision shall be made for housing the workers at site if required, with all necessary infrastructure and facilities such as fuel for cooking, safe drinking water, medical health care and sanitation etc.

21. Ambient air quality will be monitored at the site and the nearest habitation in the months of January, April and November, Ambient air quality at the boundary of the precise mining area shall conform to the norms prescribed by MoEF, GOI

22. Measures shall be taken for control of noise level to the limits prescribed by CPCB.

23. An environment audit shall be annually carried out during the operational phase and be submitted to the District Mining officer.

24. Digital processing of the entire lease area in the district using remote sensing technique shall be done regularly once in three years for monitoring and report submitted to the District mining Officer. The funds earmarked for environmental protection measure shall be kept in separate account and shall not be diverted for other purpose. Year wise expenditure shall be reported to the Regional Office, Ministry of Environment and Forests, Bhopal.

25. Revenue Authorities shall submit within 3 months their policy towards address (i) standard operation process / procedure to bring into focus any infringement/deviation/violation of environmental norms / conditions,(ii) Hierarchical system or Administrative order to deal with environmental issues and to ensure compliance of EC conditions and (iii) System of reporting of non compliance /violation of environmental norms to the District Collector.

26. The Tahasildar shall submit six monthly reports in hard and soft copy on the status of compliance of the stipulated environmental clearance condition including results of monitored data (both in hard & soft copies) to the District Mining Officer and the District Collector, the respective Regional Officer of the Maharashtra Pollution Control Board.

27. Any change in mining area, khasra / Gat numbers, entailing capacity addition with change in process and of mining technology, modernization and scope of working shall again require prior Environmental Clearance as per provisions of EIA Notification, 2006 (as amended).

28. DEAC appraised the proposals on the basis of information submitted by concerned Tahasildar shall submit the list of blocks satisfying condition stipulated above to Revenue dept. The list of blocks and condition stipulated above shall be made available in public domain. It should be published in two local language newspapers and each block where mining operation is proposed. Tahasildar should ensure this and submit compliance report to District Collector with approval from District mining officer.

**(भानुदास पालवे)**
**अपर जिल्हाधिकारी, अहमदनगर**